नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०४/२०२६ (शनिवार )**

---

# अग्निशस्त्रासह २ मोबाईल एकुण १ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त, २ आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— दिनांक १७/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनिय माहीती मिळाली की, मौजा निंबा येथे राहणारा इसम नामे सुजित ठाकुर हा देशी बनावटीचे अग्नीशस्त्र बाळगुन कोणतातरी हस्तक्षेपनीय गुन्हा करण्याचे तयारीत आहे. नमुद माहीती प्राप्त होताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात मौजा निंबा बसस्टॉप परिसरात सापळा रचला असता, एक इसम संशयास्पदरीत्या फिरताना दिसुन आला. त्यास ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारले असता **आरोपी क्रं १) सुजित जितेंद्र जचपेले उर्फ ठाकुर, वय २३ वर्ष, रा. निंबा वार्ड नं. ०२, ता. पारशिवनी, जि. नागपुर** असे नाव समजले. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीची अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यातून एक आयफोन मिळुन आला. सदर आयफोनची पाहणी केली असता त्यातील हिडन फोल्डर मध्ये एक अग्नीशस्त्रचे फोटो दिसुन आले. त्यास विश्वासाने विचारपुस केली असता त्याने त्याचे अग्नीशस्त्र त्याचा मित्र अंकीत वाळके रा. पारशिवनी याचेकडे ठेवायला दिले असल्याचे सांगीतले. सदर माहीतीवरून पोलीस पथकाने तात्काळ **आरोपी क्रं २) अंकीत राजु वाळके, वय ३० वर्षे, रा. सोनार मोहल्ला, पारशिवनी** याचे घराची घरझडती घेतली असता त्याचे घरातुन देशी बनावटीचे पिस्टल (माउजर) हे अग्निशस्त्र

मिळुन आले. सदर अग्निशस्त्राच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे जवळ कोणताही परवाना नसल्याची माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) एक देशी बनावटीचे पिस्टल (माउजर) किंमती ४०,०००/— रूपये, २) एक आयफोन व एक मोबाईल किंमती ७०,०००/— रूपये असा एकुण १,१०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोस्टे पारशिवनी येथे कलम ३/२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस पोलीसांनी अटक केली आहे. साखळी पुरावे जोडुन पोलीस अधिक तपास करीत आहेत.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**



# कोंढाळी पोलीस स्टेशन येथील दरोडयाच्या गुन्हयातील सन २०२४ पासुन मिळुन येत नसलेल्या पाहीजे आरोपीला अटक स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी :—** दिनांक १०/१२/२०२४ रोजी फिर्यादी गजानन सुखदेवराव ब्राम्हणे, वय ४० वर्ष, रा. मुलताई चौक, वरूड, ता. वरूड, जि. अमरावती यांनी पोलीस स्टेशन कोंढाळी येथे तक्रार दिली की, फिर्यादीच्या मित्राला एका अज्ञात व्यक्तीने फोनवरून सांगितले कि, जमीनीतील गुप्त धन पिवळे सोने माझेकडे असुन ते मी किंमतीमध्ये विकतो. त्यानंतर नमुद आरोपीने पिवळया धातुचे शिक्के फिर्यादीस आणि त्याच्या मित्रांना आणुन दाखविले. आरोपींनी फिर्यादीस पोलीस ठाणे कोंढाळी जि. नागपुर हद्दीतील अंकलेश्वर धाबा येथे बोलावले. आरोपींनी फिर्यादीकडील रोख रक्कम रोख रक्कम १८,००,०००/— घेतली. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीस वेगवेगळ्या ठिकाणी फिरवून वेळ मारून नेली. पुढे कोंढाळी ते काटोल रोडवरील गजकेसरी रिसॉर्ट जवळ आरोपींनी संगनमताने बनावट पोलीस असल्याचे भासवून फिर्यादीस अडवून धमकावले, मारहाण केली व त्यांच्या खिशातील रोख रक्कम ३,०००/— रूपये तसेच मोबाईल जबरदस्तीने हिसकावून घेतला. फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोस्टे कोंढाळी येथे अप. क्र. ८२२/२४ कलम ३१०(२), ३१८(४), ३१६(२), २०४, ६१(२), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयातील **आरोपी नामे सुमित उर्फ सुमेध दत्तोपंत आठवले, वय ५० वर्ष, रा. संजय गांधी नगर, अमरावती हा गुन्हा घडल्यापासुन मिळुन येत नव्हता.** सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान यापुर्वी १२ पैकी १० आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपी क्रं १) प्रमोद उर्फ पप्पु कृष्णकुमार अवस्थी, २) आशुतोष उर्फ आशु प्रमोद अवस्थी दोघे रा. फ्लॅट क.१०३, ताजश्री पॅलेस, जगनाडे चौक, नागपूर,३) विनोद चिंधुजी मस्करे, रा. मलकापुर पोस्टे कवठा बहाडे, ता. जि. अमरावती,४) शेख एजाज शेख अहमद ,रा. पाणीचे टाकीजवळ, परतवाडा जि. अमरावती ५) उमरखान साहेबखान पठाण ,रा. वार्ड क्रमांक १७, बंगला चौक, वरुड ता. वरुड जि. अमरावती,७) राजेंद्र नथ्थुजी धुताले ,व्यवसाय मजुरी, रा. बौध्द विहार जवळ, खोलवटपुरा, मोर्शी ता. मोर्शी जि. अमरावती, ९) अमीत शेषराव तसरे, रा. इंदीरा नगर, चांदुर रेल्वे ता. चांदुर रेल्वे जि. अमरावती,८) विलास रामराव पंडीत ,रा. यशोदा नगर, फ्रेजरपुरा ता. जि. अमरावती, ९) पियुष निलकमल खैरवाल, गरोबा मैदान,

नागपुर, आणि क्रं १०) संजु महाजन, रा.वर्धा यांना यापुर्वी अटक करण्यात आली असुन सदर आरोपी हे टोळीने कट रचुन याप्रकारचे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाले.

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी,उपविभाग काटोल यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर गुन्हयाच्या समांतर तपासादरम्यान सायबर पोलीस स्टेशन, नागपुर ग्रामीण यांच्या मदतीने तांत्रिक पुराव्यावरून सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी क्रं ११) सुमित उर्फ सुमेध दत्तोपंत आठवले, वय ५० वर्ष, राहणार संजय गांधी नगर, अमरावती याला दिनांक १८/०४/२०२६ रोजी संजय गांधी नगर, अमरावती येथुन ताब्यात घेतले. नमुद आरोपीवर मालमत्तेविरूध्द अनेक गंभीर गुन्हे दाखल असुन पोलीस स्टेशन परतवाडा अमरावती (ग्रामीण) येथील दरोडयाच्या गुन्हयात सुध्दा नमुद आरोपी हा पाहीजे आरोपी आहे.**

## अल्पवयीन बालीकेचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला मा न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन उमरेड** :— अल्पवयीन फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन उमरेड येथे अप क्र. ८२३/२०२१ कलम ३५४(अ) (३),२९४, ५०६ भादवी सहक. ८ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, यातील **आरोपी नामे ऋतिक प्रमोद बोबडे, वय २४ वर्षे, रा. शिरपुर, ता. उरमेड, जि. नागपुर** हा सदर गुन्हयातील अल्पवयीन पिडीत/ फिर्यादीच्या परिचीत होता. फिर्यादीने आरोपीसोबत बोलणे बंद केले त्यामुळे दिनांक २७/१२/२०२१ रोजी आरोपी याने फिर्यादीला तु माझ्या सोबत बोलणे का बंद केले. तु माझी नाही तर कोणाचीच नाही असे म्हणत फिर्यादीला अश्लिल शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली.

श्रीमती शितल खोब्रागडे ,सहा पोलीस निरीक्षक, नेम पोलीस स्टेशन उमरेड यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक १८/०४/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश श्रीमती एच. ए. अन्सारी यांनी नमुद आरोपी **नामे ऋतिक प्रमोद बोबडे, वय २४ वर्षे, रा.**

**शिरपुर, ता. उरमेड, जि. नागपुर यास  कलम २९४ भादवि मध्य २ महीने सश्रम कारावास व १००० /— रू. दंड, दंड न भरल्यास १० दिवस साधा कारावास , कलम ५०६  भादवि मध्य ६ महीने सश्रम कारावास व १००० /— रू. दंड , दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री पंकज तपासे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री. धनाजी जळक, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन उमरेड , पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री गणेश भुरे, ब.नं १५८२, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार सहा. फौजदार वनिता सावरकर ब. नं. ३०९ यांनी मदत केली आहे.

## अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध ,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन रामटेक येथे दिनांक २०/०६/२०२५ रोजी अप क्र ४७०/२०२५ कलम १३७ भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा शोध लागत नव्हता. नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी, वय १७ वर्षे हीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पोउपनि श्री मंगेश वानखडे, मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे, पोलीस अंमलदार पन्नालाल बटाउवाले, पोलीस अंमलदार भाग्यश्री राउत त्यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. दिनांक १७/०४/२०२६ रोजी नमुद गुन्हयातील अपहृत मुलीचा गोपनिय माहीतीच्या आणि तांत्रिक पुराव्यावरून आधारे काटोल पोलस स्टेशन हद्दीतुन रेल्वे गेट जवळुन ताब्यात घेतले. सदर गुन्हयाचा पुढील तपास रामटेक पोलीस करीत आहेत.

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, ०६ लाख ५ हजारांचा मुद्देमाल जप्त मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक १८/०४/२०२६ रोजी मौदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा धामनगाव आजनगाव रोडवर नकटुजी महाराज मंदीराजवळ आजनगाव शिवार येथे नाकाबंदी केली असता आयसर कंपनीचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर हा विनाक्रमांकाच्या ट्रॉली सह मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक पवन अर्जुन चौधरी, वय ३१ वर्ष, रा. धामनगाव ता. मौदा, जि. नागपूर हा मिळुन आला.** आरोपीस रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नव्हता. सदर वाहन आरोपी **पवन अर्जुन चौधरी याचेच मालकीचे असल्याची माहीती प्राप्त झाली.**

**पोलीसांनी पंचासमक्ष एक विनाक्रमांकाचा ट्रॅक्टर किंमती ५,००,०००/— रूपये विनाक्रमांकाची ट्रॉली किंमती १,००,०००/—रूपये आणि ०१ ब्रास रेती किंमती ५,०००/— रूपये असा एकुण किमती ६,०५,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन मौदा येथे कलम ३०३(२), भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४,२१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०३ गुन्हे नोंद.

दिनांक १७/०४/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन वडोदा, उमरेड, भिवापूर यांनी अवैधरित्या सट्टापट्टी खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्ट्‌ापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण २२५२/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये एकुण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे आहेत.

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत मौजा पंचायत समिती जवळ उमरेड येथे **आरोपी नामे किशोर प्रभाकर क्षिरसागर, रा. येवले ले आउट परसोडी** हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असताना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी ५४०/— रूपये असा एकुण ५४५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

तसेच पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत भिवापूर बस स्टॉप येथे **आरोपी नामे गौतम जंगलु येवले, रा. किन्ही खुर्द, ता. भिवापूर, जि. नागपूर** कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असताना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी १५०/— रूपये असा एकुण १५५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

तसेच पोलीस स्टेशन वडोदा अंतर्गत वार्ड नं. २, शिवाजी चौक येथे **आरोपी नामे परवेश इसराइल शेख, वय ३० वर्षे, रा. वॉर्ड नं. ०२, वडोदा ता. कामठी नागपूर** हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असताना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी १५५०/— रूपये असा एकुण १५५२/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ८ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक १७/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **मोहाफुल दारू, देशी दारू असा एकुण ४७१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) राजेंद्र जनार्दन पवार, वय ५० वर्ष, २) महिला आरोपी दोन्ही रा. हिवरमठ, ता. नरखेड, जि. नागपूर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे राजेंन्द्र शामरावजी गजभिये, वय ५५ वर्ष, रा. घरतवाडा, त. काटोल, जि. नागपूर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) गोपीचंद विठोबाजी सोनवणे, वय ६० वर्ष, रा. अजनी शेरडी २) दुर्गेश रामअचल चव्हान, वय ३३ वर्ष, रा. नागमंदीर रोड, नविन गुजरखेडी ३) सुखशांती तुलारामजी नारनवरे, वय ३१ वर्ष, रा. परसोडी वकील, ता. कळमेश्वर याचेवर प्रत्येकी १ असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे आशिष बबन रामटेके, वय २६ वर्ष, रा. परसोडी जवाहरनगर, ता. जि. भंडारा याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे आरोपी नामे कमलाकर तुळशीराम सुळीतकर, वय ५२ वर्ष, रा. सरोदी टोला, ता. पारशिवनी, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. अशा ०९ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०८ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ३९ लिटर मोहाफुल गावठी दारू २) २१६० मिली देशी दारू असा एकुण ४७१०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७१६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १८/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७१६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण १०० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १२१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १२५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १५ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १४ आरोपी अशा एकुण ६१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३५ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २७ आरोपी अशा एकुण १४७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ७० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण १६२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन येथे एकुण ७१६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने